<u>नियमित दिवाणी दावा क्र.१२९/२०१७ मधील नि.क्र.१६ वरील आदेश</u>
**( CNR – MHRG14-0019042016)**

*नंदकुमार वसंत दर्णे ... वादी*
*वि.*
*सरपंच ग्रुपग्रामपंचायत केगाव ... प्रतिवादी*

१. प्रतिवादी तर्फे प्रस्तुत अर्ज कैफियत वेळेत न दाखल न केल्याने दिनांक ३०/०१/२०१९ रोजी विना कैफियत आदेश रद्द होण्याकामी केलेला आहे. वादीचे म्हणणे वाचले.

२. प्रतिवादी तर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर प्रतिवादी हे सरपंच व ग्रामसेवक असल्याने त्यांना त्यांचे दैनंदिन शासकीय कामकाजामुळे दाव्या संबधीची माहिती व कागदात्रे वेळे मध्ये उपलब्ध होवु शकले नाही. व त्यामुळे सदरची कागदपत्रे वकीलांना वेळेत देता आहे नाहीत. त्यामुळे त्यांना विहीत मुदतीत त्यांची कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे दिनांक ३०/०१/२०१९ रोजी या न्यायालयाने प्रतिवादी विरूध्द विनाकैफियत आदेश पारीत केलेला आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता प्रतिवादींनी दाखल केलेली कैफियत नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने दाव्याच्या पटलावर येणे अत्यंत आवश्यक आहे. वादींतर्फे वकीलांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादीने दाखल केलेला अर्ज हा खोडसाळ असुन दाव्यात त्यांना वेळोवेळी संधी देवुन देखील त्यांनी कैफियत दाखल केलेली नाही. तसेच नि.५ चा अर्ज देखील विनाकैफियत सुनावणी झाला आहे. असे असताना देखील वादीने कोणतेही सयुक्तीक कारण नसताना केवळ दाव्यास विलंब करण्याच्या हेतुने सदरची कैफियत विलंबाने दाखल केली आहे. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा. परंतु ते पुढे कथन करतात की, न्यायहिताचे दृष्टीने अर्ज मंजूर करणेचा झाल्यास जास्तीत जास्त खर्च बसविण्यात यावा.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हक्क प्रस्थापनेकरीता, ठरावाकरीता, सरस-निरस वाटपाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे सदर प्रकरणात त्यांची कैफियत

दाखल करून दाव्यास विरोध करणार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जातील कारणे विचारात घेता त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी, प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता यावे व प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता प्रतिवादी यांस कायद्यानुसार समान संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. वादींना जो असोईस्करपणा झाला त्याकरीता प्रतिवादी यांना खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तीक होईल असे माझे मत आहे. त्यामुळे वरील बाबींचा परिस्थितीचा व अर्जातील कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आला आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी यांचा अर्ज (नि.क्र.१६) रक्कम रु. ५००/- च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम रु.५००/- ही वादींना दयावी. |

उरण.
दिनांक : २९/०९/२०२१

( आर.बी.पोळ )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.